# नियमित दिवाणी दावा क्र.२६९/२०१६ मधील नि.क्र.३२ वरील आदेश

**( CNR : MHAH190008652016 )**

०१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.५ लतीफ तर्फे दाखल करण्यात आला. सदर प्रतिवादी यांचे असे कथन की, त्यांना कागदपत्रे मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करून त्यांची कैफियत पटलावर घेण्यात यावी.

०२. वादी यांनी सदर अर्जावर निशाणी क्र.४० अन्वये लेखी म्हणणे दाखल करून हरकत नोंदविली की, सदर प्रतिवादीने दिलेला अर्ज हा संयुक्तिक नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर पाडण्याच्या हेतूने उशिराने अर्ज दिला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करणे योग्य वाटत असल्यास वादीला रक्कम रु. ५,०००/- खर्च मिळावा. वादी तर्फे विधिज्ञ श्री. पी. ए. फलके यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. टी. ए. पठाण यांनी युक्तिवाद केला.

०३. प्रतिवादी क्र. ५ यांना प्रस्तुत दाव्याचे समन्स निशाणी क्र.१५ हे निशाणी क्र. २१ च्या आर.पी.ए.डी. अन्वये दि.१७/०१/२०१८ रोजी अगर त्यापूर्वी प्राप्त झाल्याचे दिसुन येते. सदर प्रतिवादीने मुदतीत लेखी कैफियत दाखल केलेली नाही. म्हणून निशाणी क्र.०१ वरील दिनांक २४/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये संचिकेचे कामकाज प्रतिवादी क्र.५ विरुध्द एकतर्फा आदेशान्वये आजतागायत सुरू आहे. सदर प्रतिवादीतर्फे दि. ०३/०७/२०१८ रोजी प्रस्तुत अर्ज व वकिलपत्र निशाणी क्र.३४ दाखल करण्यात आले. एकंदरीत सदर प्रतिवादींना लेखी कैफियत दाखल करण्यास ५ महिन्यांपेक्षा जास्त विलंब झाल्याचे दिसुन येते. प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द अतिक्रमीत भागाचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना योग्य त्या पुराव्यानिशी त्यांचे म्हणणे मांडणेकामी संधी मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे झालेल्या विलंबापोटी एकूण रुपये ५००/- च्या खर्च रकमेवर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो :-

**-: <u>आ ा दे श ा</u> :-**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.५ लतीफ यांनी खर्चाची एकूण रक्कम रू.५००/- वादीस पुढील तारखे पावेतो अथवा त्यापूर्वी द्यावी.

ठिकाण : शेवगांव
दिनांक : १८/०४/२०१९

(आ. सु. आलेवार)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
शेवगांव.